महिमाला न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना जाणार उच्च न्यायालयात >> पान 2

अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत शनिवारी फोस्टेक प्रशिक्षण >> पान 3

जल जीवन मिशनच्या कामाचा बट्ट्याबोळ >> पान 4

**सुविचार**

इतरांच्या चुका पाहून शहाणपणाने शिकणे अधिक चांगले.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 170 ■ शुक्रवार, दि. 31 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




मुंबईतील मार्गाला ज्येष्ठ अभिनेते रमेश देव यांचं नाव, मुलगा म्हणाला, 'हा स्वप्नपूर्तीचा क्षण'

आतील पान

# अर्थसंकल्पापूर्वी मोदी सरकारचा मोठा निर्णय!

## देशातील शेतकऱ्यांना होणार मोठा फायदा

**नवी दिल्ली : १ फेब्रुवारीला देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन या अर्थसंकल्प सादर करणार आहेत. या अर्थसकंल्पापूर्वी केंद्र सरकारनं शेतकऱ्यांसाठी मोठ निर्णय घेतला आहे. इथेनॉलच्या किंमती वाढवण्यासाठी केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. इथनॉल खरेदीसाठी सुधारित किमती या १ नोव्हेंबर २०२४ पासून ते ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत लागू राहणार आहेत याबाबतची माहिती . केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांन दिली.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सीसई- (कॅबिनेट कमिटी ऑन इकॉनॉमिक अफेअर्स) ने इथेनॉल खरेदीसाठी सुधारित किमतींना मंजुरी दिली आहे. या किमती १ नोव्हेंबर २०२४ पासून ते ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत लागू राहतील. या निर्णयासह, इथेनॉल मिश्रित पेट्रोल प्रोग्राममद्वारे सी-हेवी मोलॅसिसची एक्स-मिल किंमत ५६.५८ रुपये प्रति लीटरवरून ५७.९७ रुपये प्रति लीटर झाली आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. याशिवाय कच्च्या तेलावरील देशाचे अवलंबित्व कमी होऊन परकीय चलनाची बचत होण्यास मदत होणार आहे.

देशात इथेनॉलचा अधिकाधिक वापर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. तसेच सरकार हरित ऊर्जेच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे ते म्हणाले. केंद्रातील मोदी सरकारने या वर्षी ३१ ऑक्टोबर रोजी संपलेल्या २०२४-२५ कालावधीसाठी उ हेवी मोलॅसीसमधून मिळणाऱ्या इथेनॉलच्या एक्स-मिल किंमतीत १.६९ रुपयांनी वाढ करून ५७.९७ रुपये प्रति लिटर करण्यास मान्यता दिली आहे. उसाचा रस, साखर आणि साखरेच्या पाकापासून उत्पादित बी हेवी मोलॅसेस आणि इथेनॉलच्या किमती अनुक्रमे ६०.७३ रुपये प्रति लिटर आणि ६५.६१ रुपये प्रति लिटरवर कायम आहेत.

सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यानी इथेनॉल खरेदी किंमतीत सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे. २०२५-२६ ते २०३० पर्यंत पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचे उद्दिष्टही सरकारने वाढवले आहे.

या दिशेने एक पाऊल म्हणून, तेल विपणन कंपन्यांनी चालू इथेनॉल पुरवठा वर्ष २०२४-२५ मध्ये १८ टक्के मिश्रण साध्य करण्याची योजना आखली आहे आहे. मोदी सरकारने बुधवारी देशातील आणि ऑफशोअर भागात महत्त्वाच्या खनिजांच्या शोधाला प्रोत्साहन देण्यासाठी १६,३०० कोटी रुपयांच्या राष्ट्रीय गंभीर खनिज अभियानाला मंजुरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाने ही मान्यता दिली. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्रि्वनी वैष्णव म्हणाले की, या अभियानाचा उद्देश महत्त्वाच्या खनिजांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि स्वावलंबन सुनिश्रि्चत करणे हा आहे. NCMM खनिज उत्खनन, खाणकाम, लाभ, प्रक्रिया आणि जीवनाच्या शेवटच्या उत्पादनांची पुनर्प्राप्ती यासह मूल्य साखळीच्या सर्व टप्प्यांचा समावेश करेल.


## कुंभमेळा : जिल्ह्यातील नागरिकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन जारी ; नागरिकांनी संपर्क करण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** उत्तरप्रदेश राज्यातील प्रयागराज येथे सुरु असलेल्या कुंभमेळ्यात सहभागी होण्यासाठी गेलेल्या जिल्ह्यातील नागरिकांच्या मदतीसाठी जिल्हा प्रशासनाने नियंत्रण कक्षाचे हेल्पलाईन क्रमांक जारी केले आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी मदतीसाठी नियंत्रण कक्षाच्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या कुंभमेळ्यातील आपत्कालीन स्थितीत प्रयागराज कंट्रोल रुम टोल फ्री क्रमांक १९२०, दुरध्वनी क्रमांक ०५२२-२२३७५१५ उपलब्ध केला आहे. तसेच मंत्रालयात नियंत्रण कक्ष स्थापन केले असून त्या संपर्क क्रमांक ०२२-२२०२७९९० असा आहे. त्यासोबतच अमरावतीचे विभागीय आयुक्त कार्यालयातील नियंत्रण कक्षाच्या ०७२१-२६६१३६४ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. यासह जिल्हा पोलीस नियत्रंण कक्षाने. ०७२६२-२४२४०० तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्षाचे दुरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२६८३ हा उपलब्ध केला आहे. प्रयागराज येथील कुंभमेळ्यात दर्शनासाठी गेलेल्या जिल्ह्यातील नागरिकांनी आवश्यकतेनुसार या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## वयाच्या १४ वर्षी बुलढाण्याच्या प्रज्वल पाटीलने लिहिलेल्या पुस्तकाचा दिल्ली येथे होणाऱ्या जागतिक पुस्तक मेळाव्यात समावेश



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाण्यात नववीत शिकणाऱ्या १४ वर्षीय प्रज्वल पाटील याने स्वतः पुस्तक लिहून ते प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचा दिल्ली येथे भारत सरकार द्वारे आयोजित, एक फेब्रुवारीपासून होणाऱ्या जागतिक पुस्तक मेळाव्यात समावेश करण्यात आला आहे. चिखली शहरात राहणाऱ्या १४ वर्षीय प्रज्वल प्रकाश पाटील याला पहिल्यापासूनच पुस्तक वाचण्याची आवड असल्याने त्याने आपल्या शालेय अभ्यासक्रमासोबतच विविध धर्मग्रंथ, कादंबऱ्या, ऐतिहासिक पुस्तके आणि इतर पुस्तकांचे वाचन केले आहे. त्यानंतर त्याला लिहिण्याचीही आवड निर्माण झाली आणि त्याने VICTORY'S HIDDEN DEFEAT अर्थात विजयात दडलेला पराभव हे पुस्तक लिहून प्रकाशित केले. १ फेब्रुवारीपासून भारत मंडपम् दिल्ली येथे भारत सरकार द्वारा आयोजित जागतिक पुस्तक मेळाव्यात प्रज्वलच्या पुस्तकाचा समावेश करण्यात आला आहे.

आपल्या मुलाने अभ्यास करावा चांगले गुण मिळवावे यासाठी अनेक पालक आपल्या मुलांकडे आग्रह धरतात, तर दुसरीकडे अनेक मुलं सोशल मिडियाच्या आहारी गेले आहेत, असे असताना आपल्या मुलाने एवढ्या कमी वयात पुस्तक लिहावं आणि त्याच्या पहिल्याच पुस्तकाचा जागतिक पुस्तक मेळाव्यात समावेश झाला याचा प्रज्वलच्या आई-वडिलांनाही मोठा अभिमान आणि कौतुक वाटतं आहे. सोशल मिडिया आणि रिल्सच्या जमान्यात पुस्तक वाचनाची सवय कमी झाली आहे, मात्र प्रज्वलने कमी वयात वाचन करून लिहिलेले पुस्तक हे इतर मुलांसाठी निश्चितच आदर्श ठरणार आहे.

## तरूणांना नशेची लत लावणारा गजाआड; चाळीसगाव रोड पोलिसांनी जप्त केल्या गुंगीकारक औषधीच्या ४८० बाटल्या



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरात छुप्या पध्दतीने गुंगीकारक औषधे विक्री करीत तरूणांना नशेची लत लावणार्या एकास चाळीसगाव रोड पोलिसात गजाआड केले आहे. त्याच्याकडून ८८ हजारांच्या गुंगीकारक औषधीच्या ४८० बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. धुळे शहरातील शब्बीर नगर परीसरात मुगणे मस्जिद समोर एक जण बेकायदेशीररीत्या गुंगीकारक औषधी बाळगुन त्याची चोरटी विक्री करत असल्याची माहिती चाळीसगाव रोड पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक जिवन बोरसे यांना मिळाली होती.

माहितीच्या आधारावर त्यांनी तत्काळ उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे यांच्यासह छापा टाकत एकास ताब्यात घेतले. त्याने त्याचे नाव अकबर अली कैसर अली शहा असे सांगितले. त्यांच्याकडून मानवी मेंदुवर विपरीत परीणाम करणार्या गुंगीकारक औषधाचा साठा मिळुन आला. ८८ हजार ५२० रूपये किंमतीच्या एकुण ४८० बाटल्या जप्त करण्यात आल्या. त्याच्याविरोधात चाळीसगाव रोड पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास शरद लेंडे हे करीत असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक जीवन बोरसे यांनी यावेळी दिली...

## दुचाकींची चोरी करणाऱ्या आरोपीला गणेशपेठ पोलिसांनी ठोकल्या बेड्या

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** एमडी ड्रग्स आणि दारूचे व्यसन भागवण्यासाठी दुचाकींची चोरी करणाऱ्या आरोपीला गणेशपेठ पोलिसांनी अटक करत सहा दुचाकी जप्त केल्या आहेत. वृषभराज अशोका असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. शिवम गुप्ता याने गणेशपेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीतून संदेश दवाई मार्केटच्या पार्किंगमधून दुचाकी चोरीला गेल्याची तक्रार दिली होती. त्याचा तपास सीसीटीव्ही आणि तांत्रिक माध्यमातून करत असताना एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले आणि त्याची विचारपूस केली असता त्याने चोरी केल्याची कबुली दिली आहे. त्याच्याकडून चार गुन्हे उघाडकीस आणून सहा दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. हा आरोपी एमडी ड्रग्सचे व्यसन भागवण्याकरिता वाहन चोरी करत होता. हा रेकॉर्ड



वरील असून याच्यावर वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये या आरोपीवर गुन्हे दाखल आहेत.

## माजी सैनिकांच्या कोट्यातील जागा खुल्या प्रवर्गातून भरण्याचा घाट ; उच्च न्यायालयाची राज्य सरकारला नोटीस

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** माजी सैनिकांसाठी आरक्षित जागा अनारक्षित करू नये यासाठी मुंबई उच्च न्यायालयात स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडकडून याचिका दाखल करण्यात आली आहे. सदर याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने सैनिकांची बाजू ऐकून घेत राज्य सरकारला नोटीस देत बाजू मांडण्यासाठी २० फेब्रुवारीपर्यत मुदत दिली आहे. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर उच्च न्यायालय निर्णय देणार आहे.

दरम्यान, न्यायालयाकडून दिल्या गेलेल्या सूचनांप्रमाणे राज्य सरकारची बाजू ऐकल्यानंतर पुढील आदेश होतील. उच्च न्यायालयाकडून पुढील आदेशापर्यंत माजी सैनिकांसाठी रिक्त जागांवर अन्य उमेदवारांची नियुक्ती करणे उचित ठरणार नाही. सदर भरती प्रक्रियेत माजी सैनिक आरक्षित जागांवर इतरांना नियुक्ती देणेबाबत प्रतीक्षा करावी, असे निवेदन कोल्हापूर जिल्हाधिकारी आणि कोल्हापूर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष रुपेश पाटील यांनी दिले आहे. निवेदनाची प्रत कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनाही देण्यात आली आहे. तसेच पुण्यातील सैनिक कल्याण विभागाच्या उपसंचालकांना सुद्धा देण्यात आली आहे. देशासाठी लढणाऱ्या सैनिकांना सेवानिवृत्तीनंतर सरकारी नोकरीमध्ये स्वतंत्र १५ टक्के राखीव जागा आरक्षित ठेवल्या गेल्या आहेत. याचा गैरफायदा घेऊन त्यांचे हक्क असलेल्या सरकारी नोकरी इतरांना दिल्यास माजी सैनिकांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. देश संरक्षणासाठीचे योगदान, त्याग, निष्ठा बलिदान, सेवेचा सन्मान होणे आवश्यक आहे. सैनिक शहीद झाल्यावरच प्रशासन सलामी द्यायला पुढे होणार आहे का? असा प्रश्न पडतो. माजी सैनिकांच्या कल्याणाची जबाबदारी सरकारची आहे. त्यांच्या आरक्षणाला धक्का लागल्यास सैनिकांमध्ये मानसिक ताणतणाव वाढेल , नवीन करिअर सेवा निवृत्तीनंतर जमणार नाही. प्रसंगी सिक्युरिटी गार्ड हा एकच पर्याय राहतो. त्यामुळे उच्च न्यायालयाचा पुढील आदेश येईपर्यत सदर जागा राखीव ठेवाव्यात अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे.

# नव्या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या ५१९ कोटींच्या प्रारूप आराखड्यास मान्यता

**पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक**

- जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण ४००.७८ कोटी
- अनुसूचित जाती उपयोजना १०० कोटी
- आदिवासी घटक कार्यक्रम १८.६५ कोटी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने सन २०२५-२६ या नव्या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ४००.७८ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना घटक कार्यक्रमाअंतर्गत १०० कोटी व आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत १८.६५ कोटी अशा एकूण ५१९. ४३ कोटींचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला असून या प्रारुप आराखड्यास पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.




निवडणुकीनंतर जिल्ह्याची पहिली जिल्हा नियोजन समितीची बैठक ही जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झाली. या बैठकीला केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, सर्वश्री आमदार चैनसुख संचेती, सिद्धार्थ खरात, श्र्वेता महाले, मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत सन २०२५-२६ साठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत शासनाने ४००.७८ कोटी रुपये कमाल आर्थिक >> पान २

### मंजूर आराखड्यातील सर्व कामे मार्च अखेरपर्यंत पूर्ण करावे- ना. मकरंद पाटील

चालु आर्थिक वर्षासाठी (२०२४-२५) ४४० आराखड्यास मंजुरी दिली आहे. त्यापैकी ३९४ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून कामे प्रगतीपथावर आहेत. या कामांसाठी राज्य शासनाकडून एकूण नियतव्ययपैकी १७६ कोटी रुपये प्राप्त झाले असून त्यापैकी १५१ कोटी रुपये (८५.८३%) निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित निधी उपलब्ध करुन मिळण्याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करणार असून तो लवकरच प्राप्त होईल. तथापि मंजूर आराखड्यातील सर्व कामे मार्च अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले.

## अर्थसंकल्प : अपेक्षा मोठ्या...

देशाचा अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन संसदेत मांडणार आहेत. रिझर्व्ह बँकेला नवे व्ह रुजू झाले आहेत. भारतातच नव्हे जगभरची अर्थव्यवस्था स्लोडाऊन दिसते आहे. आपला विकास दर तुलनेने चांगला असला तरी घटला आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प आरुढ झाल्यावर त्यांनी उलट सुलट निर्णय व घोषणा सुरू केल्याने जागतिक अर्थव्यवस्थेत प्रचंड चढ उतार होताना दिसत आहेत. रशिया युक्रेन युद्ध थांबेल असे वाटते आहे. जगभर तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होते आहे. रोजगार संधी नष्ट होत आहेत. मोदी ३ सरकारने सत्तारूढ होताना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी लागणार आहे. अशावेळी सादर होणारा अर्थसंकल्प मोठ्या कसरतीचा ठरणार आहे पण या अर्थसंकल्पातून भारताची अर्थव्यवस्था गतीमान होणार का ? हा मुख्य प्रश्न आहे. जोडीला महागाई, विषमता, कृष क्षेत्रातील अडचणी, दर्जेदार शिक्षण, आयकर असे अनेक विषय व अपेक्षा आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांना आठवा वेतन आयोग मंजूर झाला आहे. तथापि अनेक समाज घटक असे आहेत की ते रोजचा दिवस ढकलत आहेत. रेवडी संस्कृती वाढत आहे. आयकर भरणारे सर्व असंघटित आहेत पण आयकरातून सामाजिक सुधारणा व्हाव्यात, रेवड्या वाटणे, आमदार-खासदार यांना मानधन, भत्ते वाढवणे यासाठी आयकर वापरला जाऊ नये अशी मागणी होत आहे. आयकर मर्यादा वाढवावी इथपासून आयकर दाते वेगवेगळ्या मागण्या करत आहेत. देशातील क्रयशक्ती वाढावी यासाठी व्याजदर कमी करावेत, द्रव्यता वाढवावी अशीही मागणी आहे. भारताचे सारे शेजारी भारतावर वाकडी नजर ठेवून आहेत. ओघानेच संरक्षण खर्च वाढणार आहे. रस्ते विकास, रेल्वे विकास, विमानसेवा व त्यासाठीची विमानतळे, स्टॉर्टअप उद्योग, ग्रीन एनर्जी, पायाभूत उद्योग हे प्राधान्याचे विषय असणार आहेत. आर्थिक सर्वेक्षण सादर झाले की अर्थव्यवस्थेचा आरसा दिसेल. गेल्या वर्षी निवडणुका होत्या, आचारसंहिता आणि दोनवेळा अर्थसंकल्प यामुळेही अर्थव्यवस्था मंदावली, सरकारी कामे त्यासाठीचा खर्च याला मर्यादा आल्या. आता ती कसर भरून काढून आपली अर्थव्यवस्था जागतिक पाचव्या क्रमांकावरुन तिसऱ्या स्थानावर आणणे यासाठी अर्थव्यवस्थेत ठोस उपाययोजना कराव्या लागतील. पंडित दीनदयाळ यांच्या अंत्योदय विचारांसाठी केवळ भाषण नव्हे तर कृती केली पाहिजे. संपर्क क्रांती आणि संगणक व तंत्रज्ञान विकास यामुळे शिक्षणापासून शेतीपर्यंत आणि प्रशासनापासून प्रवासापर्यंत सर्व क्षेत्रात मोठे बदल होत आहेत. शेती व उद्योग, व्यवसायात रोबोरुळू लागले आहेत. अशावेळी बेरोजगारी वाढणार हे स्पष्ट असले तरी ज्ञान तंत्रज्ञान प्रगत आणि कौशल्यपूर्ण शिक्षणावर भर देण्याची त्यासाठी शिक्षणाची दिशा बदलण्याची गरज आहे. अर्थसंकल्पात नव्या दिशा आणि विविध आव्हानांवर मात करण्याची शक्ती हवी तरंच त्यात अर्थही असेल आणि संकल्पही असेल अन्यथा मोठमोठे आकडे आणि टीकाटिपणी या पलीकडे काहीही होणार नाही. देशात कर्जबाजारी व कर्जबुडव्या लोकांची संख्या वाढत आहे. खासगी उद्योगात नोकरी करणाऱ्या अनेकांना तूटपुंजे पगार आणि निवृत्तीनंतर किरकोळ भविष्य निर्वाह निधी व हजारो हजार पेन्शन मिळते. आयुष्यभर राबणाऱ्या या मंडळींना उत्तर आयुष्यात सामाजिक संरक्षण मिळाले पाहिजे. सध्या जो आयकर आकारला जातो, त्यात जुने कोष्टक, नवे कोष्टक असे प्रकार आहेत. यावेळीही आयकरात बदल अपेक्षित आहेत ते करताना सुलभता असणं गरजेचे आहे, क्लिष्टता असेल तर पळवाटा शोधल्या जातात, चुकवेगिरी वाढते आणि टीकाटिपणीही होते. या पार्श्र्वभूमीवर आयकर मर्यादा वाढवणे आणि त्यात सुलभता आणून रेवडी संस्कृती रोखणे हा उपाय आहे. जागतिक तापमान, हवामान बदल, नैसर्गिक संकटे, जल, वायू, मृदा प्रदूषण यावर मात करण्यासाठी तरतूद व कायदे गरजेचे आहेत. ओघानेच सरकारकडून त्या अपेक्षा आहेत. आयात निर्यात धोरण आणि जागतिक व्यापार या दिशेने सावध पावले उचलली पाहिजेत. विशेष करुन या संदर्भात अमेरिका नवनव्या भूमिका घेताना दिसते आहे. अशावेळी सावधानता तर हवीच पण मात करणारे उपाय केले पाहिजेत. केंद्रात एनडीए आघाडीचे सरकार आहे त्याला दोन टेकू आहेत. नितीशकुमार आणि चंद्राबाबू यांच्या अटी व अपेक्षा असणार आहेत. महाराष्ट्रात भाजपला मोठा विजय मिळाल्याने भाजपाची मरगळ सरली आहे. अर्थसंकल्पात महाराष्ट्राला बक्षीस द्यावे लागेल, लहान गावे, स्वयंपूर्ण गावे, सेंद्रिय शेती, ग्रामोद्योग, गरीब आणि मध्यमवर्गीय समाजाला केंद्रबिंदू ठेवून अर्थव्यवस्था गतीमान करणारा आणि सर्वांना समाधान देणारा अर्थसंकल्प साधारण निवडणूक तोंडावर असताना सादर होतो. आता निवडणुकीनंतरचा हा पहिला अर्थसंकल्प आहे. मोदींची ही तिसरी टर्म आहे, मोदींनी आणि भाजपने समान नागरी कायदा, एकाच वेळी सर्व निवडणुका, शेतीचे उत्पन्न तिप्पट करणार, पर्यटन व व्यापार जोडीला स्टार्टअप उद्योग, ग्रीन एनर्जी यासाठी आश्र्वासने दिली आहेत. या आश्र्वासनाचे प्रतिबिंब अर्थसंकल्पात दिसले पाहिजे अशा अनेक अर्थांनी यावेळचा अर्थसंकल्प आव्हानात्मक आहे. पण ही झेप घेण्याची संधीही आहे. पुढील सप्ताहात अर्थव्यवस्थेवर व संकल्पावर प्रभाव टाकणाऱ्या बाजू स्पष्ट होणार आहेत. फेड बँक आपले धोरण जाहीर करणार आहे, व्याजदर कटची घोषणा व आयकर रद्दची अमेरिकेत चर्चा आहे. अमेरिका स्वदेशीचा नारा देताना दिसते आहे व अमेरिकेने घुसखोरांना बाहेर काढायला व युक्रेनची मदत रोखण्याचा निर्णय घेतला आहे, याचा परिणाम अपेक्षित आहे. आपले आर्थिक सर्वेक्षण काय दर्शवते, व्याजदराबाबत नवे गव्हर्नर व सरकार काय निर्णय घेते हे बघावे लागेल पण अवघे विश्र्व कुस बदलण्याच्या तयारीत आहे. अशावेळी निर्मला सीतारामन यांना अर्थसंकल्प सादर करणे कसोटीचे आहे. 'सबका साथ, सबका विकास' हे सरकारचे ब्रीद आहे. अनेकांच्या अनेक अपेक्षा आणि मंदावलेली अर्थव्यवस्था गतीमान करुन क्रयशक्ती कशी वाढवली जाते हे पाहणे कुतूहलाचे ठरणार आहे.

# महिमाला न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना जाणार उच्च न्यायालयात

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी** :येथील स्टुडन्ट वेल्फेअर इंग्रजी माध्यम शाळेच्या बसचां दिनांक २५ रोजी पळशी फाटा येथे भीषण अपघात झाल्याने त्यात १३ वर्षीय महिमाचे दुर्दैवी निधन झाल्याने सर्वत्र शोककळा पसरली होती याप्रकरणी दिनांक २८ रोजी शिवसेना (शिंदे ) गटाचे पदाधिकाऱ्यांनी महिमाच्या घरी भेट देऊन सांत्वना दिली.

यावेळी तिच्या कुटुंबीयांनी घटना घडल्यानंतर तब्बल सहा दिवसानंतरही महिमाला न मिळालेल्या न्यायाबद्दल माहिती दिली यावरून शिवसेनेच्या वतीने महिमाला न्याय मिळवून देण्यासाठी लोक वर्गणीतून उच्च न्यायालयात धाव घेऊन याचिका दाखल करणार असल्याचे शिवसेनेचे शहर प्रमुख ड संजय जाधव यांनी सांगितले.

### लोकवर्गणीतून होणार याचिका दाखल

अवघ्या तेरा वर्षाच्या महिमाचे शाळा प्रशासनाच्या दुर्लक्षित धोरणामुळे अपघाती निधन झाले परंतु यामध्ये शाळा प्रशासनाने ज्या पद्धतीने लक्ष देणे गरजेचे आहे ते होत नसून पोलीस प्रशासनावर देखील राजकीय दबाव असल्याचा संशय व्यक्त होत असल्याने महिमा आला न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना न्यायालयात जाणार आहे या याचिकेचा खर्च लोकवर्गणीतून होणार असून नागरिकांनी सहानुभूतीपूर्वक विचार करून याचिकेमध्ये प्रत्येकाचा सहभाग म्हणून वर्गणी जमा करणार असल्याचे शिवसेनेच्या वतीने सांगण्यात आले आहे





स्टुडन्ट वेल्फेअर इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये शिकत असलेली कु. महिमा अप्पाराव सरकाटे हिचा दि २५ रोजी झालेल्या स्कूलबस च्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला तिच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या दोषी संस्थाचालक व सर्व संचालकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून अटक करा व शाळेची मान्यता रद्द करा या मागणीसाठी दिवटपिंपरी , पोफाळी , पळशी , कळमुला , जनुना या पाच गावातील शाळेतील पालक वर्गांनी शाळेच्या प्रांगणात ठिया आंदोलन केले होते परंतु आश्वासन देऊन दोन दिवस उलटले तरीही कुठलीही ठोस कारवाई प्रशासनाच्या वतीने झाली नाही त्यामुळे प्रशासनावर राजकीय दबाव आहे की काय असा संशय व्यक्त केल्या जात आहे

सदर घटनेस शाळेचे संस्थाचालक व प्रशासन जबाबदार असून दोषी संस्थाचालक व सर्व संचालकांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून संस्थाध्यक्ष दर्शन अग्रवाल व सर्व संचालकांना अटक करा व शाळेची मान्यता रद्द करून मृतक कु महिमाला न्याय द्या अशा आशयाची याचिका शिवसेना शिंदे गटाच्या वतीने उच्च न्यायालयात लवकरच दाखल करणार असल्याचे शिवसेना शिंदे गटाच्या वतीने स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत सांगितले यावेळी शिवसेनेचे रवीकांत रुडे , शहर प्रमुख एडवोकेट संजय जाधव ,अनिल नरवाडे, कैलास कदम, संदीप ठाकरे , बसवेश्र्वर क्षीरसागर ,एड अजय पाईकराव ,दामोदर इंगोले, अनंतराज अमृते, विष्णु मत्ते, श्रीनिवास शर्मा ,राजू गायकवाड ,सपना चौधरी,सारिका बोकांडे, वर्षा वानखेडे , नंदा काळे, ज्योती जोगदंड यासह अनेक शिवसैनिक यावेळी बैठकीला उपस्थित होते.

# वसंत पंचमी दिवशी श्री विठ्ठल रुक्मिणी चा शाही विवाह सोहळा





दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी** : श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचा विवाह सोहळा माघ शुध्द १ ते ५ या कालावधीत संपन्न होत असून, मुख्य दिवस वसंत पंचमी म्हणजे दिनांक ०२ फेब्रुवारी रोजी आहे. त्या निमित्ताने श्री विठ्ठल सभामंडप येथे दुपारी ०४.०० ते सायं ०६.०० या वेळेत श्री रूक्मिणी स्वयंवर कथेचे आयोजन करण्यात आले असून, त्याचे निरूपण श्री क्षेत्र पंढरपूर येथील प्रख्यात श्रीमद् भागवताचार्य कु. साध्वी अनुराधा (दिदी) राजेंद्र शेटे यांचे सुमधूर व रसाळ वाणीने करण्यात श्री रूक्मिणी स्वयंवर कथा दि. ३० जानेवारी ते ०१ फेब्रुवारी या दरम्यान दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी मंदिर समितीने केली असून, परंपरेनुसार वसंत पंचमी दिवशी स.१०.०० ते १२.०० या वेळेत श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचा विवाह सोहळा संपन्न होत आहे. त्या दिवशी येणा-या भाविकांना अन्नछत्रात विशेष भोजनाची व्यवस्था, थेट प्रेक्षपण, मंदिर परिसरात एलईडी स्क्रिन, स्वच्छता , मंडप, मंदिरात आकर्षक फुलांची सजावट, सुरक्षारक्षक नियुक्ती तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. विवाह सोहळा संपन्न झाल्यानंतर दुपारी प्रदक्षिणा मार्गावर शोभा यात्रा काढण्यात येणार असल्याचेही मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री श्रोत्री यांनी सांगितले

पान १ वरून...

# नव्या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या ५१९ कोटींच्या प्रारूप आराखड्यास मान्यता

मर्यादा निश्र्चित केली आहे. त्यानुसार अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी ९३६.२४ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. राज्यस्तरीय बैठकीत ५३५.४६ कोटी रुपये वाढीव आराखड्याची मागणी करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीने मान्यता प्रदान करण्यात आली. अनुसुचित जाती उपयोजनाअंतर्गत शासनाने १०० कोटी रुपये कमाल आर्थिक मर्यादा निश्र्चित केली आहे. त्यानुसार अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी रु. १६४.०२ कोटी नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. राज्यस्तरीय बैठकीत ६४.०२ कोटी रुपये वाढीव आराखड्याची मागणी करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली असून हा प्रारुप आराखडा राज्यस्तरीय समितीकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती या बैठकीत देण्यात आली.

तसेच आदिवासी घटक कार्यक्रम अंतर्गत शासनाने १८.६५ कोटी रुपये कमाल आर्थिक मर्यादा निश्र्चित केली आहे. त्यानुसार अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी ३३.९० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. राज्यस्तरीय बैठकीत १५.२५ कोटी रुपये वाढीव आराखड्याची मागणी करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली.

या बैठकीत सन २०२४-२५ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी घटक कार्यक्रमाच्या जानेवारी अखेर खर्चाचा आढावा घेण्यात आला. यामध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मुळ मंजूर नियतव्यय ४४० कोटी रुपये असून त्यापैकी ३९३.३१ कोटींच्या प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहेत. अनुसूचित जाती उपयोजना योजनेसाठी मुळ मंजूर नियतव्यय १०० कोटी रुपये असून त्यापैकी ८१.०१ कोटींच्या प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहे. तसेच आदिवासी घटक कार्यक्रम योजनेसाठी मुळ मंजूर नियतव्यय १८.०९ कोटी रुपये असून त्यापैकी ६.०८ कोटींच्या प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असल्याची माहिती या बैठकीत देण्यात आली.

तसेच या बैठकीत जिल्ह्यातील कृषी, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, रस्ते आदी क्षेत्रातील कामांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये शासकीय रुग्णालयांची सुधारणा, जिल्हा परिषद शाळांतील प्रसाधनगृह स्वच्छता, वैद्यकीय अधिकारी भरती, ट्रॉमा केअर सेंटर, मॉडेल स्कुल, मागेल त्याला सौर कृषी पंप, व्यायमशाळा, पीक विमाबाबत आमदारांनी उपस्थित केलेल्या विषयांवर बैठकीत चर्चा करण्यात आली.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार, समाज कल्याण सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी व्यवहारे यांनी आराखड्याचे सादरीकरण केले.

# मुंबईतील मार्गाला ज्येष्ठ अभिनेते रमेश देव यांचं नाव, मुलगा म्हणाला, 'हा स्वप्नपूर्तीचा क्षण'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : तब्बल सहा दशके मराठीसह हिंदी मनोरंजन विश्र्व गाजवलेले अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते असे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व रमेश देव यांची ९६ वी जयंती ३० जानेवारीला पार पडली. रमेश देव यांच्या जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारच्या वतीने त्यांना खास आदरांजली देण्यात आली आहे. अंधेरी येथील वर्सोवा परिसरातील एका रस्त्याचे 'अभिनेते श्री. रमेश देव मार्ग' असे नामकरण करण्यात आले. नुकताच या संबंधिचा कार्यक्रम पार पडला आहे.

रमेश देव यांनी मराठीसह अनेक हिंदी सिनेमांमधून त्यांचं अभिनय कौशल्य दाखवलं आहे. अशा या महान कलाकाराला आदरांजली देण्यासाठी आमदार अमित साटम यांच्या संकल्पनेतून हे नामकरण करण्यात आले. मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंतांचा गौरव करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या 'मराठी चित्रपट कट्टा' चे लोकार्पण आणि रस्त्याचे नामकरण सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी बोलताना रमेश देव यांचे पुत्र अभिनेते अजिंक्य देव म्हणाले, 'आज संपूर्ण देव कुटुंबियांसाठी हा स्वप्नपूर्तीचा आणि आनंदाचा दिवस आहे. आज बाबांच्या प्रेमापोटी इथे उपस्थित असलेल्या सर्वांचे मी आभार मानतो. बाबांच्या नावाचा मार्ग झाला याचा खूप आनंद झाला आहे. हे बाबांचे आशीर्वाद आहेत. याचा त्यांना ही निश्र्चितच आनंद झाला असेल.'

याप्रसंगी ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त, ज्येष्ठ गायिका वैशाली सामंत, दिव्या खोसला कुमार, कांचन घाणेकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते दि. चिखली अर्बन विद्यानिकेतन स्नेहसंमेलनच्या 'ऋणानुबंध माती'चे उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : चिखली अर्बन बहुद्देशीय संस्था संचालित चिखली शहरातील दि. चिखली अर्बन विद्यानिकेतनच्या वतीने विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलनचे उद्घाटन ऋणानुबंध मातीचे दिनांक ३० जानेवारी रोजी केंद्रीय मंत्री श्री. प्रतापराव जाधव यांची शुभहस्ते उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिखली अर्बन बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष श्री. सतीश गुप्त हे होते.

यांप्रसंगी प्रास्ताविक करताना संस्थेचे सचिव डॉ. आशुतोष गुप्ता यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दि. चिखली अर्बन विद्यानिकेतन सदैव अग्रेसर असते. अभ्यासासोबतच क्रीडा, संगीत व इतर क्षेत्रातही आपल्या शाळेचे विद्यार्थी अग्रेसर आहेत. शैक्षणिक क्षेत्रात सुद्धा सी.बी.एस.ई. बोर्डाने घेतलेल्या परीक्षेत विद्यानिकेतनच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा उज्वल यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी







शाळेतील शिक्षक वृंद अथक परिश्रम करतात. २०१४ मध्ये सुरू झालेली दि. चिखली अर्बन विद्यानिकेतन ही इंग्रजी माध्यमाची शाळा जरी असली तरी इंग्रज तयार करणे हा शाळेचा उद्देश्य नसून विद्यार्थ्यांच्या मनात जाज्वल्य राष्ट्रभक्ती निर्माण करणे हा शाळेचा मुख्य व मूळ उद्देश आहे. प्रत्येक वर्षी सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना संस्कृतीशी जुळवून ठेवणे व आपल्या संस्कृतीबद्दल आपुलकी निर्माण करणे यासाठी शाळेचा सतत प्रयत्न असतो असे सुद्धा सांगितले. स्नेहसंमेलनामुळे मुलांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळतो.

या वेळी कार्यक्रमाचे उद्घाटक केंद्रीय मंत्री श्री. प्रतापराव जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, श्री. सतीश गुप्ता यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या या शाळेने अल्पावधीतच यश प्राप्त करून नावलौकिक प्राप्त केला आहे. तसेच गेल्या काही वर्षांपासून कल्पकतेने शाळेच्या विकासाकरिता डॉ आशुतोष गुप्ता यांनी कल्पकतेने केलेल्या प्रयत्नांना यश येत असल्याचे आवर्जून सांगितले. शाळेच्या यावर्षीचे स्नेहसंमेलनाची संकल्पना ही विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या मातीविषयी प्रेम आणि आत्मीयतेची भावना निर्माण करेल असा विश्र्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

देशातील नागरिकांचे प्रकृती परीक्षण कार्यक्रमात जगात भारताचे नाव झाले असून हा जागतिक रेकॉर्ड असून या अभियानाचे सचिव या नात्याने डॉ. आशुतोष गुप्ता यांनी या अभियानाची धुरा सक्षमपणे सांभाळली असे प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्री माननीय श्री.प्रतापरावजी जाधव यांनी केले.

स्नेहसंमेलनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात रेणुका मातेचे वहन व देवीचे सोंग तसेच गजानन महाराजांची दिंडी या कार्यक्रमाचे आकर्षणाचा मानबिंदू ठरले. विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील संत ते सण हा सर्व प्रवास त्यांच्या नृत्य सादरीकरणातून सादर केला विद्यार्थ्यांनी गीता श्र्लोक संग्रहाचे सामुहिक पठण केले. त्या नंतर रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली.

या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्री. सतीश गुप्त त्याचप्रमाणे श्री. विजय कोठारी, श्री. रामकृष्णदादा शेटे, श्री. प्रेमराज भाला, श्री. पंडितराव देशमुख, श्री. कैलास भालेकर, श्री. विलास घोलप, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. मनोहर खडके, सचिव डॉ. आशुतोष गुप्ता, सहसचिव श्री.पुरुषोत्तम दिवटे, दि चिखली अर्बन बहुउद्देशीय संस्थेचे संचालक श्री. राजेंद्र शेटे, श्री विश्र्वनाथ जितकर, पालक संचालिका सौ. ज्योत्स्ना गुप्ता, डॉ. सौ. पूजा गुप्ता, सौ. सुनीता भालेराव, चिखली अर्बन बँकेचे सरव्यवस्थापक श्री. शशांक पंधाडे त्याचप्रमाणे शाळेचे प्राचार्य श्री. गौरव शेटे इत्यादी मान्यवर व मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिव्या भालके, वेदिका सोनोने, शौर्य शेळके, अंजली पायघन, नैतिक खंडेलवाल, त्रिनभ जाधव इत्यादी विद्यार्थ्यांनी केले. आभार प्रदर्शन विद्यार्थिनी प्रतिनिधी श्रेयसी पाटील हिने केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### ट्रॅक्टर पळविणाऱ्या टोळी गजाआड, बार्शी तालुका पोलिसांची कामगिरी



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** बार्शी तालुक्यातील साखर कारखान्यास गाळपास ऊस आणून तो खाली करून परत जाताना चालकास तीन आरोपीने अडवून मारहाण करून हातपाय बांधून ट्रॅक्टर चोरुन नेल्याने तालुका पोलिसात गुन्हा दाखल होताच पथकांनी याचा तपास करताना चार आरोपींना अटक करून त्यांनी विविध ठिकाणी चोरलेले १० ट्रॅक्टर,२ ट्रेलर, मोबाइल असा ५५ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.जीग्नेश आडगळे,विजय साळवे,धीरज कारके,प्रदीप तौर अशी आरोपीची नावे असून त्यांना बार्शी तालुका पोलिसांनी अटक केली आहे.ही घटना १ जानेवारी २०२५ रोजी बार्शी मुद्देमाल जप्त केला.

तालुक्यातील उपळाई ठोंगे येथील इंद्रेश्र्वर साखर कारखान्यास ऊस आणून तो उतरवून परत जाताना ट्रॅक्टर चालकास अडवून जबर मारहाण करून चाकूचा धाक दाखवून बाजूच्या शेतात नेऊन बांधून ठेवून आरोपीने तो ट्रॅक्टर चोरून नेला होता. याबाबत तालुका पोलिसात गुन्हा दाखल होताच यातील आरोपीची माहिती काढून पोलीस पथकाने तपास करताना आरोपीची माहिती मिळताच पोलिसांनी ताब्यात घेतल आहे.

### ढाणकी येथे अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी :** वैकुंठवासी ह.भ.प. कामाजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने गेल्या आठ दिवसापासून, विठ्ठल नामाच्या गजरात, ढाणकी शहरात अखंड हरिनाम सप्ताह , श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तथा संगीतमय श्रीमद् भागवत कथेच्या निमित्ताने महाकुंभ अवतरले होते.

दिनांक २२ जानेवारी ते २९ जानेवारी पर्यंत या सप्ताहाचे आयोजन, विठ्ठल रुक्मिणी वारकरी मंडळ तथा समस्त ग्रामवासीयांनी केले होते. सप्ताहात ह.भ.प. गजानन महाराज सायखेडकर, ह.भ.प. अरुण गुरुजी आळंदीकर, ह.भ.प. राजु महाराज नागरे, ह.भ.प. निळोबा महाराज हरबळकर, ह.भ.प. गणेश महाराज बेंद्रीकर, ह.भ.प. गजानन महाराज कदम, ह.भ.प. श्रीकांत महाराज पुणे व ह.भ.प. नामदेव महाराज काकडे यांनी कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन केले. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ ह.भ.प. रामदास महाराज ठाकरवाडीकर यांनी सांभाळले.

तर संपूर्ण सप्ताहाचे विशेष व मुख्य आकर्षण राहिले ते म्हणजे संगीतमय श्रीमद् भागवत कथा. ह.भ.प. नामदेव महाराज काकडे यांच्या ओजस्वी व रसाळ वाणीतून श्रीमद् भागवत कथेने ढाणकीकरांना मोहून टाकले.

सदर सप्ताहात शहरातील नामवंत दानदात्यांनी सर्व महाराज व भव्य महाप्रसादाचे सौजन्य देऊन दानशुरतेचं आदर्श उदाहरण समाजासमोर ठेवलं. येत्या काळात अजूनही दानदाते स्वेच्छेने समोर येत असून, ढाणकी येथील अखंड हरिनाम सप्ताह दिवसेंदिवस भव्य स्वरूप प्राप्त करेल. असा विश्र्वास आयोजन कमिटीचे अध्यक्ष डॉ. एल.एम. रावते यांनी व्यक्त केला.

### शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर घेणार ठाकरेंची भेट, ईव्हीएम चा लढा तीव्र करण्याचे संकेत

**मुंबई/प्रतिनिधी :** निवडणूक प्रक्रियेत ईव्हीएम फॅक्टर आहे, तो हेराफेरी करणारा आहे. त्यामुळे विधानसभेचा निकाल अनपेक्षित लागल्याचे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार उत्तम जानकर, यांनी केले. याबाबत पुढच्या आठवड्यात मी राज ठाकरे यांना भेटणार असल्याचे जानकर म्हणाले. राज ठाकरे यांना माझ्याकडील पुरावे दाखवले तर ते आणखीन या लढईत ताकतीने उतरतील असे जानकर म्हणाले. ईव्हीएमबाबतच्या लढ्यामुळं राज ठाकरेंना त्यांची पार्टी उभारण्यात मदत होईल असे जानकर म्हणाले. ईव्हीएमच्या लढ्यात मी राज ठाकरेंचे स्वागत करतो असेही जानकर म्हणाले.

ईव्हीएम मशीनने अनेक लोकांचा जीव घेतला आहे. लोकांचा आक्रोश मांडण्यासाठी या ईव्हीएममध्ये दुरुस्त करणे गरजेचे असल्याचे जानकर म्हणाले. मारकडवाडी संदर्भात मी राज ठाकरेंची भेट घेणार आहे. सोमवारी किंवा मंगळवारी ही भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. मारकडवाडी प्रकरणासंदर्भात माझ्याकडे अनेक पुरावे आहेत ते मी इलेक्शन कमिशनलाही दिले आहेत. १५ दिवसांची वेळ दिली असल्याचे जानकर म्हणाले. विधानसभेच्या निवडणुकीला चिठ्ठी पडण्याची वेळ वेगळी होती. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत ज्या कक्षात सीसीटीव्ही लावले आहे. त्यातील पाच कक्षाचे सीसीटीव्ही देण्याची मी मागणी केली आहे असे जानकर म्हणाले.

# अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत शनिवारी फोस्टेक प्रशिक्षण

## हॉटेल, केटरींग व्यवसाय चालकांनी सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते ३ वाजेदरम्यान हॉटेल, रेस्टॉरंट, केटरिंग व्यवसाय चालकांसाठी फोस्टेक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण मोफत असून मे. नर्मदा हॉटेल, चिखली रोड, बुलढाणा येथे होणार आहे. जिल्ह्यातील हॉटेल, रेस्टॉरंट, केटरिंग अन्न व्यवसाय चालकांनी मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक आयुक्त प्रमोद पाटील यांनी केले आहे.

फोस्टेक प्रशिक्षण हा भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचा उपक्रम असून भारत सरकार आणि अन्न सुरक्षा आयुक्त यांचे निर्देशानुसार घेण्यात येत आहे. हॉटेल, रेस्टॉरंट, आणि केटरिंग व्यवसाय चालवण्याऱ्यांसाठी प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त असून केवळ अन्न सुरक्षा सुनिश्र्चित होत नाही, तर व्यावसायाची विश्र्वासार्हत आणि गुणवत्ता देखील वाढते. प्रशिक्षणाचा उद्देश अन्न सुरक्षा आणि स्वच्छता याबाबत जागरुकता निर्माण करणे व अन्न व्यावसाय चालकांना योग्य प्रशिक्षण देणे हा आहे.

फोस्टेक प्रशिक्षणामुळे अन्न सुरक्षा मानकांचे योग्य पालन करणे सोपे होते, ग्राहकांपर्यंत सुरक्षित आणि दर्जेदार अन्न पोहोचवण्यासाठी मदत मिळते. तसेच ग्राहकांना हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या सर्व नियमांचे पालन होत आहे, याची खात्री मिळते. स्वच्छता, अन्न हाताळणी, आणि आपात्कालीन स्थिती हाताळण्याबद्दल कर्मचारी अधिक जागरुक आणि प्रशिक्षित होतात. अन्न सुरक्षा मानकांचे पालन न केल्यास व्यवसायाला दंड किंवा परवाना रद्द होण्याचा धोका असतो. प्रशिक्षणामुळे हे धोके कमी होतात. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर सहभागी अन्न व्यवसाय चालकाना फोस्टेक प्रमाणपत्र दिले जाते.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या अधिकृत प्रशिक्षण भागीदारामार्फत प्रशिक्षण दिले जाणार असून सदर प्रशिक्षण पूर्णपणे मोफत आहे. प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी हॉटेल, रेस्टॉरंट, केटरिंग व्यवसायाची परवाना प्रत, व्यवसायातर्फे सहभागी होणारे मालक, शेफ, सुपरवायजर यांचे आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक, अन्न व औषध प्रशासन बुलढाणा कार्यालयात जमा करावे अथवा प्रशिक्षण संस्थेच्या मोबाइल क्रमांक ९४२०४४०२८१ वर माहिती पाठवावी.

# जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धा संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटना बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धा शारदा ज्ञानपीठ विद्यालय बुलढाणा येथे दि.२६ ते २९ जानेवारी दरम्यान आयोजन करण्यात आले होते. यावेळी विजेता खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेमध्ये १० संघानी सहभागी झाले होते. सामने साखळी बाद पध्दतीने खेळविले गेले. वयोगट १३ वर्षा आतील मुलांसाठी बुलढाणा जिल्ह्यामध्ये प्रथमच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेमध्ये एकूण २१ सामने खेळविण्यात आले. प्रत्येक सामन्यामधून उत्कृष्ठ खेळाडूंचे पारीतोषिक देण्यात आले. प्रथम चार संघाना चषक व रोख पारीतोषिक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेमध्ये मलकापूर संघाने उत्कृष्ठ खेळाचे प्रदर्शन करीत स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. शारदा ज्ञानपीठ विद्यालयाने द्वितीय क्रमांक तर शारदा ज्ञानपीठ संघ ब, बुलढाणा यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. पोदार इंटरनॅशल स्कूल, बुलढाणा यांनी चर्तुथ क्रमांक प्राप्त केला. तसेच पुर्ण स्पर्धेमधून उत्कृष्ठ गोलकिपर आरव राणे, उत्कृष्ठ डिफेन्डर गगन जाजू, उत्कृष्ठ मीड फिल्डर सोहम जावरे, उत्कृष्ठ फॉर्वड रुद्र गौतम व बेस्ट प्लेअर ऑफ द टुरनामेन्ट सोहम सौंडलकर यांनी वैयक्तीक पारीतोषीक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पंच म्हणून अर्जुन दांडगे, ओम बनसोडकर, प्रेम सोनुने, गजानन हिरे व ओम हिवाळे यांनी कामकाज बघितले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरणासाठी प्रमुख अतिथी जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर, शारदा ज्ञानपीठचे अध्यक्ष डॉ. देशपांडे, जिल्हा फुटबॉल संघटनाचे अध्यक्ष एस.एस.ठाकरे, सरचिटणीस एन. आर.वानखेडे उपस्थित होते. स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे सर्व अधिकारी, कर्मचारी व जिल्हा फुटबॉल संघटनेचे सर्व पदाधिकारी तसेच मुकेश बाफणा, डॉ जीवन मोहोड, मनोज श्रीनीवास यांनी परिश्रम घेऊन यशस्वी आयोजन केले.

## आरक्षणाची मागणी, सुरेश धस यांचा कलेक्टरांना फोन, अर्धा तास चर्चा, जरांगे यांनी उपोषण सोडले!

**जालना/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणासाठी प्राणांतिक उपोषणाला बसलेले नेते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण तूर्त मागे घेत असल्याचे जाहीर केले. शिंदे समितीचे काम पुन्हा सुरू करा, शिंदे समितीला निधी वाढवून द्या तसेच आरक्षण आंदोलनातील मुलांवरील केसेस मागे घ्या, अशा मागण्या त्यांनी पुन्हा एकदा शासनाकडे केल्या. सरकारने दिलेला शब्द पाळावा नाहीतर आम्ही मुंबईकडे कूच करून संपूर्ण शहर बंद पाडू, असा इशारा त्यांनी उपोषण सोडताना दिला.

प्रजासत्ताकदिनाच्या पूर्वसंध्येला सुरू झालेले मनोज जरांगे यांचे उपोषण सहाव्या दिवशी स्थगिती करण्यात आले. यावेळी बीडचे खासदार बजरंग सोनवणे, भाजप आमदार सुरेश धस तसेच जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ उपस्थित होते.

आरक्षणासाठी येथून पुढे उपोषण करणार नाही, आता थेट मंर्त्यांना भिडणार, नडणार

आरक्षणाच्या मागणीसाठी येथून पुढे उपोषण करणार नाही. आता थेट मुंबईला जाऊन मंर्त्याशी समोरासमोर लढू आणि भिडू. आम्हाला दिलेला शब्द जर पाळला नाही तर सरकारचे जगणे मुश्कील करू, असा इशारा त्यांनी दिला.शिंदे समितीला मुदतवाढ द्या, तिन्ही गॅझेट लागू करणार, विशेष कक्ष सुरू करणार, आरक्षण आंदोलनातील मुलांवरील केसेस मागे घ्या, आंदोलनात बलिदान झालेल्या दिलेल्या कुटुंबीयांना मदत द्या, अशा मागण्या जरांगे यांनी केल्या.

## राज ठाकरेंची परिस्थिती गजनी चित्रपटातील हिरोसारखी; अजित पवार गटाच्या नेत्यांचा मनसे प्रमुखांवर जोरदार पलटवार

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. ३०) मुंबईत मनसेचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलताना राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या विजयाबाबत शंका उपस्थित केली. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर देखील राज ठाकरेंनी जोरदार हल्लाबोल केला. लोकसभेला अजित पवारांचा केवळ एक खासदार निवडून आला. त्यानंतर चारच महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे ४२ आमदार कसे निवडून आले? हा प्रकार संशय निर्माण करणारा असल्याचे त्यांनी म्हटले. आता राज ठाकरेंच्या वक्तव्यावरून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रवक्ते सुरज चव्हाण आणि आनंद परांजपे यांनी जोरदार पलटवार केलाय.

## चंद्रपूर मनपाच्या भोंगळ कारभारा विरोधात जनविकास सेनेचे सत्याग्रह आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर मनपा तर्फे भूमिगत गटार योजना व अमृत पाणी पुरवठा योजनेसाठी नव्याने पाईप टाकण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. काही वर्षांपूर्वी या दोन्हीही योजनेसाठी शंभर कोटी रुपयांची चंद्रपूर शहरात भूमिगत गटारी योजनेसाठी पाईप टाकण्यात आली होते. पाच ते सहा वर्ष त्या योजनेचे काम चालू होते. दरम्यान नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागला होता. अजून पर्यंत ती पाईपलाईन योजना सुरू झाली नाही मात्र नवीन ५०६ कोटींच्या भूमिगत गटारच्या योजनेला महानगरपालिकेने सुरुवात केली आहे. पहिल्या गटारी योजनेचे काय झाले? असा प्रश्न जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष पप्पू देशमुख यांनी चंद्रपूर मनपाला केला आहे. त्याचप्रमाणे २३४ कोटी रुपयांची पहिली अमृत पाणीपुरवठा योजनेचे अजूनही नागरिकांना पाणी मिळाले नाही आणि दुसऱ्या २७० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजनेचे काम महानगरपालिकेने सुरू केले आहे. या महानगरपालिकेच्या भोंगळ कारभारा विरोधात शहरातील प्रियदर्शनी इंदिरा गांधी चौक येथे जनविकास सेनेतर्फे आज महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त मनपाने खोदकाम केलेल्या खड्डात सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. मनपाच्या या भोंगळ कारभाराची जिल्हा प्रशासनाने दखल घेऊन कारवाई करण्याचे ४८ तासाच्या आत पत्र द्यावे अशी मागणी देखील जनविकास सेनेचे अध्यक्ष पप्पू देशमुख यांनी केली आहे.

# मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प ३ फेब्रुवारीला सादर होणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प ३ फेब्रुवारी रोजी सादर होणार आहे. यासाठी आयुक्त आणि प्रशासक म्हणून भूषण गगराणी पहिल्यांदाच अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

आगामी मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात पर्यावरण, प्रदूषण आणि बेस्टसाठी ठोस उपाययोजना आखण्याची शक्यता वर्तविण्यात येतेय. गेल्या वर्षीच्या तुलनेने या वर्षाच्या अर्थसंकल्पात विकासाच्या दृष्टीने वेगवेगळ्या प्रकारची तरतूद करण्याची शक्यता आहे. या वर्षाचा अर्थसंकल्प ६५ हजार कोटींचा टप्पा पार पडण्याचा अंदाज आहे. देवनार डम्पिंग ग्राउंड स्वच्छ करण्यासाठी साधारण सात ते आठ वर्ष लागणार असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. देवनार डम्पिंग ग्राउंडची जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पाला देण्याचा हेतू साध्य होणार का? हा प्रश्न देखील या ठिकाणी उपस्थित झाला आहे.

देवनार डम्पिंग ग्राउंडची १२४ एकर जागा ही धारावी पुनर्विकास प्रकल्पाला देण्यासंदर्भात राज्य सरकारने मंजुरी दिल्यानंतर त्या ठिकाणी असलेल्या कचऱ्याचे डोंगर साफ करण्याची सूचना राज्य सरकारने मुंबई महापालिकेला दिल्या आहेत. यासाठी जवळपास अडीच हजार कोटी रुपये मुंबई महापालिकेला देवनार डम्पिंग ग्राउंडची जागा स्वच्छ करण्यासाठी खर्च करावे लागणार आहेत. या सगळ्या विरोधात आदित्य ठाकरे यांनी सुद्धा काल पत्रकार परिषद घेऊन आवाज उठवला.

यामध्ये महत्त्वाचं म्हणजे देवनार डम्पिंग ग्राउंडवर कचऱ्याचे डोंगर साचलेले असतानाही संपूर्ण १२४ एकर जागा साफ करण्यासाठी आणि शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी किमान सात ते आठ वर्ष लागणार असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणं आहे. सद्यस्थितीत वीस लाख मेट्रिक टन जुना कचरा देवनार डम्पिंग ग्राउंड येथे जमा आहे. मुलुंड डम्पिंग ग्राउंडची जागा साफ करण्यासाठीसुद्धा मागील सहा वर्षापासून काम चालू आहे. अद्याप हे काम फक्त पन्नास ते साठ टक्के झालं आहे. त्यापेक्षा अधिक कचरा हा देवनार डम्पिंग ग्राउंडवर आहे.

शिवाय देवनार डम्पिंग ग्राउंड येथे कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प राज्य सरकारने हाती घेतले असून ऑक्टोबर महिन्यात त्याची सुरुवात होणार आहे.

# बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीएम योजनेअंतर्गत सहभागी करून घ्या

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे संबंधित विभागाला निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पीएम कुसुम योजनाचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून जनजागृती करा आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ द्या, असे निर्देश केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज प्रशासनाला दिलेत.

बुलढाणा जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक आज ३० जानेवारीला पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात संपन्न झाली. या बैठकीत संबंधित यंत्रणेला केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी निर्देश दिले. यावेळी केंद्रीय युवा कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, आमदार चैनसुख संचेती, श्र्वेता महाले, मनोज कायदे, सिद्धार्थ खरात तसेच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधिक्षक विश्व पानसरे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

बैठकीदरम्यान केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील विविध विषयांवर अधिकाऱ्यांना निर्देशित केले. यामध्ये प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान अर्थात




पीएम कुसुम योजना ही केंद्र सरकारची आहे. या योजनेअंतर्गत, शेतकऱ्यांना सौर पंप बसवण्यासाठी अनुदान दिले जातात. या योजनेचा प्रचार प्रसार करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी करून घ्यावेत, असे निर्देशीत केले. शिवाय बुलढाणा येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामासंदर्भात आढावा घेतला.

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. तेव्हा जिल्हा परिषदेच्या शाळेत सुद्धा खाजगी शाळाप्रमाणेच शिक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून सीबीएससी पॅटर्न अंगीकृत करावे. जिल्ह्यातील पांदनरस्ते येणाऱ्या मार्च पर्यंत मोकळे करावेत. पिक विम्याचे पैसे उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा होण्याच्या दृष्टिकोनातून उपाय योजना कराव्यात, आरोग्य विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्याच्या दृष्टिकोनातून उपाय योजना कराव्यात तसेच भालगाव आणि पळशी बुद्रुक येथे नव्याने प्राथमिक केंद्र सुरू करावे, असा ठराव त्यांनी नियोजन समितीच्या बैठकीत मांडला व हा ठराव बैठकीत पारित करण्यात आला.

# जल जीवन मिशनच्या कामाचा बट्ट्याबोळ

## केंद्र सरकारचा महत्वकांशी प्रोजेक्ट थंड अवस्थेत

## ठेकेदार व अधिकारी मनमानी कारभारामुळे गावा गावातील जल जीवन अर्धवट

**तालुक्यातील सर्व जल जीवन मिशन योजनेचा कामात होत असलेली दिरंगाई. अनेक गावांमध्ये कामा संदर्भात भ्रष्टाचार झाल्याच्या शेकडो तक्रारी नागरिकांच्या आहेत यामध्ये ठेकेदार व अधिकारी यांच्या संगणमताकाने होत असलेले कामांचा लवकरच होणार पर्दाफाश फक्त आपला विदर्भ वर. हे विशेष...**

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा** : तालुक्यात ९८ ग्रामपंचायत अंतर्गत ९२ वाड्यांमध्ये जलजीवन मिशनची कामे हाती घेतल्या गेली होती. या योजेनेत अनेक ठिकाणी पाण्याचा स्त्रोत नाही. कामांची गती संथ असल्याचे दिसते. काही कामे सुरुच झाली नाहीत. कामे होणार्या काही गावकर्यांना उन्हाळ्यात तीव्र पाणी टंचाईला तोंड द्यावे लागणार आहे. यामुळे कामे तातडीने सुरू व्हावी नागरिकांची ओरड आहे. बहुतांश भागात पाईपलाईनसह पाण्याच्या टाक्यांची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचे संबंधित विभागाकडे अनेक तक्रारी झाल्याचे कळते. यामुळे अधिकार्यांसमोर केल्याने जलजीवनच्या कामांचा अक्षरशः बट्ट्याबोळ झाल्याचे चित्र दिसत आहे.

तालुक्यातील जनतेला पिण्याचे पाणी देण्यासाठी जलजीवन मिशन नळ योजनेच्या कामाना सुरवात करण्यात आली होती. 'हर घर जल संकल्पना

भाग १



आहे. यानुसार भारत सरकारने २०२४ सालापर्यंत सर्व कुटुंबांना नळ कनेक्शनद्वारे पुरेसे व सुरक्षित पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी जलजीवन मिशन सुरू केले. या योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला प्रतिव्यक्ती ५५ लिटर पाणी देण्याचा सरकारचा मानस आहे. राज्य शासनाने पाणी पुरवठा विभागामार्फत योजना ग्रामीण भागात राबविण्यास कंत्राटदार नेमले. कामे करवून घेतली जात आहेत, मात्र कंत्राट एकाच्या नावे तर काम करून घेणारे दुसरेच, यामुळे कामाला दर्जा राहिला नाही. कामे कासवगतीने होत आहेत. बहुतांश कामे थंड अवस्थेत आहेत. या योजनेंतर्गत काही गावांत अद्याप टाक्या उभ्या झाल्या नाहीत. पाईप टाकण्याची कामे सुरू आहेत. मात्र अधिकारी आणि ठेकेदार हे सुस्त दिसून येत आहेत.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

# विविध वृत्त...

## महारचिकना येथे ईंग्लिश स्कुलमध्ये सिकलसेल तपासणी



दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना** : विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल महारचिकना.येथे दिनांक ३०जानेवारी रोजी विद्यार्थ्यांची सिकल सेल टेस्ट करण्यात आली एकूण २०४ लाभार्थ्यांची टेस्ट करण्यात आली .यामध्ये सर्व निगेटिव्ह टेस्ट आल्या. शाळेमध्ये वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र शिवनी पिसा डॉ. प्रांजली पिसे मॅडम ,आरोग्य सेविका दीक्षा खिल्लारे ,आरोग्य सेवक डी .एस. खंडागळे आशा सेविका सौ.गोदावरी तांदूळे मुख्याध्यापक श्री. एस.एस. ढाकणे ,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## अकोल्यात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी** : अमृतसर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा विटंबनाच्या निषेधार्थ अकोल्यात वंचित बहुजन आघाडीने एकदिवसीय धरणे आंदोलन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्याच्या घटनेमुळे देशभरातील आंबेडकरवादी समाजामध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे. या घटनेच्या निषेधार्थ वंचितने अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी वंचितचे राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा हातात घेऊन निषेध नोंदवला आहे, दोषींवर कठोर कारवाईची मागणी ही यावेळी करण्यात आली.

## शेगावात ४२ लाखांचा गांजा पकडला दोन क्किंटल ७ किलो गांजा हस्तगत, एकास अटक, १ फरार; शहर पोलिसांची कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : शेगाव पोलिसांनी काल एक मोठी कारवाई करीत तब्बल दोन क्विंटल सात किलो गांजा तस्करी होत असताना रंग यात पकडला. यामध्ये एका आरोपीला अटक करण्यात आली असून दुसरा आरोपी अंधाराचा फायदा घेत फरार झाला आहे पोलिसांनी एकूण ४२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्रतिबंधित असलेला गांजा शेगाव शहरातून इतर ठिकाणी तस्करी होत असल्याची माहिती शेगावचे ठाणेदार नितीन पाटील यांना रात्रीच्या सुमारास मिळाली त्यांनी वरिष्ठांच्या आदेशांवर सापळा रचून शेगाव नगरपालिकेच्या डम्पिंग ग्राउंड जवळ छापा टाकून डोंगर सिंग जुलाल सिंग झाडे व ४७ राहणार कुऱ्हा तालुका मोताळा याला दोन क्विंटल सात किलो गांजा व इतर साहित्य सह ताब्यात घेतले तर यावेळी दुसरा आरोपी नाग गुलजार शेख राहणार पिंपळखुटात जिल्हा अकोला हा अंधाराचा फायदा घेत फरार झाला आहे.

## नाशिक अन् रायगडच्या पालकमंत्रिपदाचा तिढा सुटणार?

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : पालकमंत्रीपदाचा तिढा सोडवण्याकरता आता नवी डेडलाईन समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्ली दौऱ्यावरुन आल्यानंतर हा तिढा सोडवला जाण्याची शक्यता आहे. या प्रकरणी राज्यातल्या तिन्ही नेत्यांमध्ये बैठकीचे सत्र पाहायला मिळू शकते. सहपालकमंत्री पदासंदर्भात चाचपणी होताना दिसत आहे. मात्र, शिवसेनेकडून यासंदर्भात थेट नकार देण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

## महामानवांची प्रतिमा न लावणाऱ्या त्या शाळेची मान्यता रद्द करा

**ढाणकी येथील सविधान प्रेमी नागरिकांचे मागणी**

दैनिक आपला विदर्भ



**ढाणकी/प्रतिनिधी** : २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा जातीय मानसिकतेतून न लावणाऱ्या ज्ञानज्योती इंग्लिश मीडियम स्कूलच्या संचालक मंडळावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी अशी मागणी येथील संविधान प्रेमी नागरिक यांनी दिनांक २८ जानेवारी रोजी निवेदनाव्दारे शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की संपूर्ण भारतात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा होत असताना सर्व कार्यालय शाळा कॉलेज या ठिकाणी संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले , परंतु ढाणकी येथील ज्ञानज्योती इंग्लिश मीडियम स्कूल या शाळेत मुद्दाम जातीय मानसिकतेतून महामानवांचे प्रतिमा लावण्यात आली नाही, या अगोदरही संविधान देणे २६ नोव्हेंबर रोजी प्रत्येक शाळेत संविधानाचे पठण करण्याचे आदेश असताना ज्ञानज्योती शाळेत मात्र पालक सभा घेऊन शाळेला सुट्टी देण्यात आले होती, महामानव आणि संविधान यांचा अवमान करणाऱ्या ज्ञानज्योती इंग्लिश मीडियम स्कूलच्या संचालक मंडळावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी अशी मागणी ठाणेदार पोलीस स्टेशन बिटरगाव, गटशिक्षणाधिकारी उमरखेड, शिक्षण अधिकारी यवतमाळ यांना येथील आजाद समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष जॉनटी विनकरे, पत्रकार ब्रह्मानंद मुनेश्र्वर, प्रहार चे तालुकाध्यक्ष सय्यद माजीद, काँग्रेसचे साहेबराव वाघमोडे, आजाद समाज पार्टीचे शहराध्यक्ष गोलू मुनेश्र्वर, भारत मुक्ती मोर्चाचे प्रकाश कांबळे, युवा शहराध्यक्ष समाधान नरवाडे, पत्रकार स्वप्निल चिकाटे, समाधान राऊत आबा गायकवाड, राजू हनवते, प्रफुल दिवेकर यांनी केली तातडीने कार्यवाही न केल्यास शाळा प्रशासनाचे विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सुद्धा देण्यात आला

## तालुक्यातील शासकीय जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या खाजगी शाळेचे अतिक्रमण हटवा अन्यथा आमरण उपोषण

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : सिंदखेड राजा तालुक्यात खाजगी शैक्षणिक संस्थांनी अनेक ठिकाणी शाळा महाविद्यालय शासनाच्या जमिनीवर अतिक्रमण करून उभे केले आहे .खाजगी आनुदानित शाळा नी अतिक्रमण करून इमारती उभ्या केल्या आहेत एकीकडे घरकुल योजनेच्या माध्यमातून अतिक्रमण करणाऱ्या लाभार्थ्यांना महसूल विभाग २० बाय ३० जागा देत नाही त्यामुळे त्यांना घरकुल योजने पासून वंचित राहावे लागत आहेत. आणि दुसरीकडे महसूल विभागाच्या शासकीय जमिनीवर खाजगी शैक्षणिक संस्थांनी कुठे १ एकर तर कुठे २ ते ३ एकर जागा ताब्यात घेतल्या आहेत आणि त्या जमिनीवर अतिक्रमण करून इमारती उभ्या केल्या आहेत त्यामुळे धनदांडग्या संस्थांनीक यांना महसूल प्रशासन पाठीशी घालत असून सदर अतिक्रमण करणाऱ्या शाळेचे अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल अशा प्रकारचे निवेदन आझाद समाज पार्टी चे तालुकाध्यक्ष रामदास कहाळे यांनी तहसीलदार सिंदखेड राजा याना दिला आहे



**आझाद समाज पार्टी चे तालुकाध्यक्ष रामदास कहाळे यांचा इशारा**

## पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ साठी पुस्तकाची निवड झाल्याने शिक्षक मनोज दराडे यांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप




**बिबी** : सिंदखेडराजा तालुक्यातील देवखेड येथील जिल्हा परिषद शाळेतील उपक्रमशील शिक्षक कवी मनोज दराडे यांनी लिहिलेल्या तंत्रज्ञानाची गोष्टपुस्तकाची महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे साठी निवड झाल्याबद्दल गावातील राजश्री शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष साहित्यिक किसन पिसे यांनी प्रजासत्ताक दिनी दराडे यांचा शाल,श्रीफळ देऊन सत्कार केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेत ध्वजारोहण शाळा समितीच्या अध्यक्षा सौ.वैशाली भोसले यांच्या हस्ते करण्यात आले तर ग्रामपंचायतच्या कार्यालयात ध्वजारोहण सरपंच सौ.शारदा संजय आढाव यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातुन आपल्या अंगभूत कलेची चुणूक दाखविल्यामुळे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करून बक्षिसांचा वर्षाव करून छोट्या छोट्या मुलांना व मुलींना प्रेरित केले.

व्यासपीठावर सरपंच सौ.शारदा संजय आढाव, शाळा समितीच्या अध्यक्षा सौ. वैशाली भोसले, उपाध्यक्षा सौ. शितल शिलवंत, उपसरपंच तुकाराम चव्हाण,ग्रामपंचायत सदस्या सौ. वर्षा आढाव, श्रीमती सुमनबाई भोसले, सौ. शारदा आबासाहेब आढाव, माजी सरपंच संजय आढाव, शाळेचे मुख्याध्यापक अशोक नागरे सर, शिक्षक शिवहरी जायभाये सर, वसंतराव भोसले, वसंतराव काळे, ग्रामविकास अधिकारी बोरुळे साहेब, सोमेश्र्वर भोसले, त्याच बरोबर गावातील प्रतिष्ठित नागरिक , अंगणवाडी सेविका, आशा कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

## क्राईम पेट्रोल फेम अभिनेता काँग्रेसच्या जाहिरातीत?

**मुंबई/प्रतिनिधी** : क्राइम पेट्रोल या प्रसिद्ध मालिकेतून घराघरात पोहोचलेल्या अनुप सोनी यांची एक व्हिडिओ क्लिप काँग्रेसच्या जाहिरातीत दिसल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. कोणत्याही पूर्वपरवानगीशिवाय त्यांचा हा व्हिडिओ वापरण्यात आल्याने त्यांच्या चाहत्यांसह अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसंच, अनुप सोनी यांनीही एक्स माध्यमावरून या जाहिरातीवर प्रतिक्रिया दिली आहे.

काँग्रेसच्या अधिकृत एक्स खात्यावरून एक जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये काँग्रेसने अरविंद केजरीवालांपासून सावध राहण्याचा इशारा दिला आहे. त्यात म्हटले आहे, ''दिल्ली की जनता, सावधान. १० साल से ये आदमी दिल्ली की जनता को ठग रहा है. गरीब देश को बदल बनाकर खुद शीशमहल में मौज उडा रहा है. इसको इस्स बार सबक सिखाना है. इस बार दरवाजा नाही खोलना है.'' त्यानंतर व्हिडिओ क्राईम पेट्रोलमधील अनुप सोनी म्हणतो, ''ऐसे हाल में बेहातर ये हैं की वक्त रहते इंसान सतर्क होकर अपने कदम पहले हाथ ले.'' हीच जाहिरात पुन्हा शेअर करत अनुप सोनी म्हणाले, ''माझ्या दूरदर्शनवरील कामाचा एक छोटासा भाग या राजकीय प्रचाराच्या व्हिडिओमध्ये वापरण्यात आला आहे. माझा याच्याशी काहीही संबंध नाही.''

## सांस्कृतिक महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो : ऋषांक चव्हाण

**डॉ जाकीर हुसैन उर्दु प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न**

दैनिक आपला विदर्भ







**डोणगाव/प्रतिनिधी** : वर्गाच्या चार भिंतीच्या आत केल्या जाणाऱ्या पेरणीतून उद्याचा समाज व राष्ट्र उभे राहत असते. विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम हे शिक्षकांचे असते. त्यामुळे विद्यार्थी ही राष्ट्राची संपत्ती असून ही संपत्ती समृद्ध करण्यासाठी शिक्षकांनी शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श विद्यार्थ्यांची संस्कारक्षम पिढी घडवावी. तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अंजनी बु! येथिल डॉ जाकीर हुसैन उर्दु प्राथमिक शाळा प्रगतीपथावर आहे.

आज या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर डॉ जाकीर हुसैन उर्दु प्राथमिक शाळेत शैक्षणिक संस्काराची जडणघडण होत आहे. त्याचं संस्काराची शिदोरी घेऊन, हा विद्यार्थी उद्या आपल्या उज्वल भविष्यासाठी आकाशी झेप घेणार आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थ्यांना घडविण्याची ताकद फक्त शिक्षकांमध्येच आहे. अशा विविध शैक्षणिक, वार्षिक स्नेहसंमेलन हा विद्यार्थ्यांसाठी आनंद सोहळा असतो.

त्याद्वारे त्यांच्या आवडीनुसार कला सादर करण्याची संधी मिळते. अर्थातच अशा स्नेहसंमेलन सांस्कृतिक उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असतो. प्राथमिक शाळेत आयोजित स्नेहसंमेलन कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना डोणगाव अर्बन बँकेचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण बोलत होते. डॉ जाकीर हुसैन उर्दु प्राथमिक शाळेत सांस्कृतिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

त्यावेळी उपस्थित शाळेचे अध्यक्ष बशिर अहेमद शेख, माजी सभापती निबांजी पांडव , मोहम्मद जाहेद, जावेद खान ,हसन कुरैशी, शरीफ खान, मोहम्मद जमील,पत्रकार सुबोध आखाडे, गणेश लहाने, युसुफ फलाही तौफीक आतार, फईम मुल्लाजी, यासीन खान ,युसुफ खान, युसुफ बागवान राजदार खान ,इस्लाम टेलर, पत्रकार आवेज खान विद्यार्थी, शिक्षक, पालक, गावकरी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.